**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २७ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था मजबूत असणं आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन.**
2. **शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारमूल्य मिळण्यासाठी पुणे इथं कापूस, हळद आणि मका पिकांसाठी 'हेजिंग डेस्क' सुरू.**
3. **नवीन शैक्षणिक धोरणात रोजगाराभिमूख कौशल्य विकासाला प्राधान्य - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नागपूरात शिक्षक परिसंवादात प्रतिपादन.**
4. **हायकोर्ट बार असोसिएशनतर्फे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा 28 जून रोजी नागपुरात सत्कार.**

-------------------------------------------

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी मजबूत MSME अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आंतरराष्ट्रीय MSME दिनाच्या कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. MSME क्षेत्र देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्या म्हणाल्या.

***(होल्ड बाईट - राष्ट्रपती - २६ सेकंद)***

***सूक्ष्म, लघु और मध्यम उद्यम ना केवल देश के सफल घरेलू उत्पाद में महत्वपूर्ण योगदान देते हैं बल्कि वे जमीनी स्तर पर नवाचार को भी बढ़ावा देते हैं। यह उद्यम रोजगार सृजन के साथ साथ सामाजिक समावेश को भी सफल प्रदान करते हैं। एमएसएमई क्षेत्र भारत के सफल घरेलू उत्पादों में 30% का योगदान रहा है। ये क्षेत्र कृषि के बाद देश में दूसरे सबसे बड़ा रोजगार सृजन करता भी है।***

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. जगभरात MSME क्षेत्राची महत्त्वाची भूमिका ओळखून संयुक्त राष्ट्रांनी २०१७ मध्ये २७ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय MSME दिन म्हणून

घोषित केला होता. यंदाचा MSME दिवसाचा विषय, शाश्वत विकास आणि नवोन्मेषाचे चालक म्हणून MSME ची भूमिका वाढवणं हा आहे.

-------------------------------------------

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी ‘मन की बात’ कार्यक्रमातून २९ जून रोजी देशवासियांशी संवादसाधणार आहेत. नागरिकांना पंतप्रधानांसोबत काही कल्पना अथवा सूचना सामायिक करायच्या असतील तर आज सायंकाळपर्यंत १८०० ११ ७८०० या क्रमांकावर संपर्क साधावा. आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरुन मन की बात कार्यक्रम प्रसारीत केला जातो.

-------------------------------------------

सुगम्य भारत ॲप

दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभता वाढवण्यासाठी सरकारनं सुगम्य भारत ॲप विकसित केला आहे. यात नुकत्याच प्रभावी सुधारणा करत वापरकर्त्यांसाठी ॲप अधिक सुलभ केला आहे. तसंच एआय-संचालित चॅटबॉट सुविधा देण्यात आली आहे. केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयानं आज प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ही माहिती दिली.

-------------------------------------------

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य बाजारमूल्य मिळावे यासाठी, बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, स्मार्ट अंतर्गत पहिल्या टप्प्यात पुणे येथे कापूस, हळद आणि मका या पिकांसाठी ‘हेजिंग डेस्क’ सुरू केला आहे. टप्प्या-टप्प्याने इतर पिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शेतकरी त्यांच्या उत्पादनांच्या भविष्यातील किंमतीतील चढ-उतारामुळे होणारे नुकसान टाळू शकतात. ‘सेबी’चे नियंत्रण असलेल्या एनसीडीईएक्स (NCDEX) संस्थेच्या कमोडिटी मार्केट्स आणि संशोधन संस्थेने (NICR) या प्रकल्पासाठी सहकार्य केले आहे. हा उपक्रम कृषी क्षेत्रातील विकासाच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाची माहिती देताना सांगितले.

-------------------------------------------

आदिवासी विकास मंत्री अशोक उईके

ज्या विश्वासाने पालक शासकीय आश्रमशाळेत मुलांना दाखल करतात त्या विश्वासाला सार्थकी लावण्याची जबाबदारी ही शिक्षक व शाळेवर असते. पालकांच्या मनात आपल्या मुलांप्रती असलेल्या उज्वल भविष्याला साकार करण्यासाठी आश्रम शाळेतील शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी कठोर मेहनत घेतली पाहिजे, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी केले.नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात कवडस येथे आश्रमशाळेत आयोजित करण्यात आलेल्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात पालकांशी साधलेल्या संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. आदिवासी मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी प्रलंबित जागा येत्या शैक्षणिक सत्रापर्यंत भरती केल्या जाणार असल्याचे ते नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत माहिती देताना म्हणाले

***(होल्ड बाईट - अशोक उईके ३४ सेकंद)***

***शासकीय आदिवासी आश्रमशाळेमध्ये 1791 जागेच्या बाबत बाय स्त्रोतच्या माध्यमातून आम्ही नौकर भरती करून विविध शाखेचे विविध विषयाचे शिक्षकाची भरती करून शैक्षणिक सत्र संपतेपर्यंत त्या शिक्षकाच्या माध्यमातून गुणवत्ता आणि अध्याय आणि अध्यापन कुठल्या प्रकारची अडचण राहणार नाही, असा संकल्प ठेऊन येणारा काळामध्ये पेसा नोकर भरतीच्या अधीन राहून या सत्रामध्ये शासकीय आदिवासी आश्रमशाळेमध्ये प्रवेशित विध्यार्थाचं शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्याचे गुणवत्ता ढासळू नये म्हणून अशा प्रकारचा निर्णय घेतला.***

याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या देशातील कोणताही आदिवासी व्यक्ती शासकीय योजनांपासून वंचित राहू नये यासाठी “प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान” हाती घेतले आहे. हे अभियान अधिक सक्षमपणे संपूर्ण राज्यात प्रभावीपणे राबविले जात असल्याचे ते म्हणाले.

---------------------------------------------

एनईपी- नितीन गडकरी

सर्वप्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध झाल्या तरीही प्रशिक्षित मनुष्यबळ ही काळाची गरज असणार आहे. हे मनुष्यबळ शैक्षणिक धोरणांमधील बदलांच्या माध्यमातून उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात व्यवसायाभिमूख तांत्रिक शिक्षण, रोजगाराभिमूख कौशल्य विकास यांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं.मंथनच्या वतीने रेशीमबाग येथील कवीवर्य सुरेश भट सभागृहात शिक्षक परिसंवाद आयोजित करण्यात आला. त्यावेळी गडकरी बोलत होते.

*(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी 35 सेकंद)*

***आणि त्यामुळे येणारा काळामध्ये हे जे नॉलेज  एज ए पॉवर आहे.या नॉलेज रुपांतर देशाच्या हिताकरता कॉन्व्हर्शन ऑफ नॉलेज इनटू  वेल्थ हे आपलं भविष्य आहे. आणि हे जे ज्ञान आणि कौशल्य कशात आहे हे एक्झाक्ट्ली जाणून घेणं, जसं डॉक्टर एखाद्या पेशंटचं एक्झाक्ट् डायग्नोसिस करतो तसंच जाणून घेणं अतिशय आवश्यक  आहे. म्हणजे एखादा उपजक स्किल डेव्हलप झालं, तर त्या कौशल्यामुळे त्याला रोजगार मिळतो.***

'२०२० मध्ये आपण शैक्षणिक धोरण स्वीकारले. त्या धोरणाचे उद्दिष्ट्य समजून घेण्याची गरज आहे. आपल्या देशात अनेक क्षेत्रात अनेक लोक उत्तम काम करतात. परंतु, भविष्यातील माणूस घडविण्यासाठी जे आवश्यक आहे, त्यानुसार उद्दिष्ट्य निश्चित करण्याची गरज आहे. जगात समाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. आपल्याला विश्वगुरू व्हायचे आहे, जगातील तिसरी अर्थव्यवस्था व्हायचे आहे आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करायचा आहे, असे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बघितले आहे. विश्वगुरू म्हणून मान्यता प्राप्त करायची असेल तर फक्त आर्थिक आधारावर ते शक्य नाही. त्यासाठी आपली संस्कृती, परंपरा, मूल्याधिष्ठित जीवन पद्धती याचा देखील विचार करावा लागेल. त्याचेही वेगळेपण समजून घ्यावे लागेल. भविष्यातील पिढी तयार करण्यासाठी ते अधिक महत्त्वाचे आहे, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

---------------------------------------------

सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई

हायकोर्ट बार असोसिएशन तर्फे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा सत्कार उद्या  शनिवारी 28 जून रोजी संध्याकाळी साडेसहा वाजता रेशीम बाग मधील  कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. गवई यांनी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आणि सरकारी वकील म्हणून नागपूर शहरात स्वतःची कारकीर्द घडवली, त्याबद्दल हा सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय उद्या रवीनगर इथल्या विधी महाविद्यालयाच्या शताब्दी वर्षा निमित्त महाविद्यालय परिसरात तयार करण्यात आलेल्या संविधान उद्देशिका पार्कचे उद्घाटन देखील त्यांच्या हस्ते होईल. तत्पूर्वी, आज जिल्हा वकील संघटनेतर्फे जिल्हा न्यायालयाच्या परिसरात संध्याकाळी सहा वाजता सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचा सत्कार समारंभ होणार आहे. या कार्यक्रमादरम्यान गवई यांच्या हस्ते जिल्हा न्यायालयाच्या नवीन विस्तारित

इमारतीमधील संविधान निर्माते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील तैलचित्राचे अनावरण देखील करण्यात येणार आहे. तसेच संविधान उद्देशिका, संगणकीकृत ग्रंथालय आणि कार्यालयाचे उद्घाटन देखील त्यांच्या हस्ते होणार आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचे आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर येथे आगमन झाले. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आणि प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

-------------------------------------------

हवामान

येत्या काही तासात नागपूर, गोंदिया, यवतमाळ, वर्धा आणि भंडारा जिल्ह्यात अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. तत्पूर्वी आज दुपारी नागपुरात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस झाला.

-------------------------------------------